# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२०                                                    दि.२२ डिसेंबर,२०२०

जळगाव दि.२२(प्रतिनिधी) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाद्वारे जळगाव केंद्रावर घेण्यात येणाऱ्या ३६ व्या महाराष्ट्र राज्यस्तरीय चाचणी (एम-सेट) परीक्षा रविवार, दि.२७ डिसेंबर, २०२० रोजी आयोजित करण्यात आली आहे.

या परीक्षेसाठी पुढील प्रमाणे परीक्षा केंद्र आहेत. मुळजी जेठा महाविद्यालयाच्या परीसरातील केंद्र संकेतांक क्रमांक १४०१- स्वामी विवेकांनद भवन-अ, केंद्र संकेतांक क्र.१४०२- स्वामी विवेकांनद भवन-ब, केंद्र संकेतांक क्रमांक १४०३- के.सी.ई.चे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, केंद्र संकेतांक क्रमांक १४०४- के.सी.ई.चे इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च सेंटर, केंद्र संकेतांक क्रमांक १४०५- के.सी.ई.चे अभियांत्रिकी महाविद्यालय, केंद्र संकेतांक क्रमांक१४०६- ॲड सिताराम (बबनभाऊ) आनंदरामजी बाहेती महाविद्यालय, केंद्र संकेतांक क्रमांक१४०७ पी.एन. लुंकड कन्या शाळा व केंद्र संकेतांक क्रमांक १४०८ ओरियन सीबीएसई स्कुल अशा एकूण आठ केंद्रावर परीक्षा घेण्यात येणार आहे. या परीक्षेसाठी ३ हजार ४२० विद्यार्थी प्रविष्ठ होणार आहेत. परीक्षेसाठीचे प्रवेशपत्र (हॉल तिकिट) setexam.unipune.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्यावर दिलेल्या सूचनांनुसार प्रवेशत्र डाऊनलोड करून घ्यावीत. यासाठी सेट परीक्षेचा अर्ज भरतांना वापरलेला लॉगीन आयडी व पासवर्ड चा उपयोग करावा. प्रवेश पत्र डाऊनलोड करतांना काही अडचणी आल्यास भ्रमणध्वनी क्रमांक ९४२३११८५०७२ वर प्रा.बी.व्ही,पवार, प्रभारी कुलसचिव तथा संपर्क व्यक्ती, सेट परीक्षा केंद्र, जळगाव यांच्याशी संपर्क साधावा. असे आवाहन करण्यात आले आहे.

---

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिद्ध करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ. सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी